दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 252, Marathi Daily Thursday, Date - 02 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २५२ वा | मराठी दैनिक | गुरूवार दि. ०२ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## वडिलांकडून तीन चिमुकल्यांना विष, स्वत:चाही अंत

**सोलापूर । प्रतिनिधी**

उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे गावात एक अत्यंत धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. कौटुंबिक वादातून एका वडिलांनी आपल्या तीन लहान मुलांना विष पाजून स्वतःही विष प्राशन केल्याची ही दुर्दैवी घटना असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, भीमा अण्णा वाघमारे (वय ३४) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते एका सिमेंट कंपनीत सिक्युरिटी गार्ड म्हणून कार्यरत होते. गेल्या काही दिवसांपासून भीमा वाघमारे आणि त्यांच्या पत्नीमध्ये घरगुती कारणांवरून वाद सुरू होता. या वादातून पत्नी माहेरी निघून गेली होती. नातेवाईकांनी दोघांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित महिलेनं सासरी परत येण्यास नकार दिल्याची माहिती समोर येत आहे.

गावातील काही नागरिकांच्या माहितीनुसार, वाघमारे कुटुंब आर्थिक आणि मानसिक तणावातून जात होते. पत्नी माहेरी गेल्यानंतर भीमा वाघमारे अधिकच एकटे पडले होते. यामुळे ते नैराश्यात गेले असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेच्या आदल्या दिवशीही ते चिंताग्रस्त अवस्थेत दिसून आल्याचे स्थानिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर मानसिक तणावाखाली असलेल्या भीमा वाघमारे यांनी टोकाचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या जानवी, प्रगती आणि बाबू या तीन लहान मुलांना वळसंग परिसरातील शेतात नेले. शेतातील एकांत ठिकाणी त्यांनी प्रथम मुलांना विषारी द्रव्य पाजले आणि त्यानंतर स्वतःही विष प्राशन केले, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. ही घटना घडल्यानंतर काही वेळाने परिसरातील नागरिकांना संशय आल्याने त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच तात्काळ स्थानिकांनी पोलिसांना आणि आपत्कालीन सेवांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. भीमा वाघमारे यांचा जागीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, तिन्ही मुलांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने



त्यांना तातडीने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले.

सध्या तिन्ही मुलांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून डॉक्टरांचे पथक त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्नशील आहे. मुलांची प्रकृती चिंताजनक असल्याने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या घटनेकडे लागले आहे. डॉक्टरांनी पुढील २४ तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून विषारी पदार्थाचा नमुना जप्त करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. तसेच पत्नी व नातेवाईकांचे जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमागील नेमकी कारणे आणि पार्श्वभूमी उलगडण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे तिऱ्हे गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. निष्पाप मुलांवर आलेल्या या संकटामुळे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. कौटुंबिक वाद, मानसिक तणाव आणि संवादाचा अभाव यामुळे अशा टोकाच्या घटना घडत असल्याची चर्चा पुन्हा एकदा पुढे आली आहे. समाजातील वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अशा घटनांना आळा घालण्यासाठी समुपदेशन, कुटुंबातील संवाद आणि सामाजिक आधार यांची गरज अधिक अधोरेखित होत आहे.

**जाहिर प्रगटन**

फक्त 300 रुपयात

दैनिक महिला संवाद मध्ये छोट्या जाहिराती आणि पॅनल जाहिराती अगदी स्वस्तात छापून मिळतील.

जाहीर प्रगटन, पाहिजेत, जन्मतारीख बदल, नावात बदल, मालमत्ता हस्तांतरण, खरेदी-विक्री व स्वरूपाच्या यासहित छोट्या जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिध्द केल्या जातील..

इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.

9168567111

## धार्मिक भावनांचा गैरवापर करून फसवणूक

**नाशिक । प्रतिनिधी**

भोंदू अशोक खरात याच्या फसवणुकीचे नवे प्रकार तपासात समोर येत असून, लोकांना धार्मिक आणि भावनिक पातळीवर गंडा घालण्याचे धक्कादायक प्रकार उघड झाले आहेत. विशेषतः शाकाहारी नागरिकांना दिशाभूल करून त्यांच्याकडून पैसे उकळल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खरात हा शाकाहारी व्यक्तींना मासा हा पाण्यातील वनस्पती आहे असे सांगून त्यांना प्रसादाच्या नावाखाली मासे खाण्यास भाग पाडत होता. काही जैन धर्मीय व्यावसायिकांनाही अशाच प्रकारे फसवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मासा कापल्यावर रक्त येत नाही, त्यात हाडे नसतात, अशा खोट्या दाव्यांद्वारे त्याने लोकांची दिशाभूल केली आणि त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतल्याचे दिसून येत आहे

या प्रकारातून अनेकांकडून लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे तपासात उघड होत आहे. धार्मिक श्रद्धा, अंधविश्वास आणि अज्ञान यांचा फायदा घेत खरातने अनेकांना लुबाडले आहे. दरम्यान, विशेष तपास पथकाच्या चौकशीत अशोक खरातच्या या बनवेगिरीचे अनेक पैलू उघडकीस येत असून, त्याच्या विरोधात आणखी गंभीर गुन्हे नोंदवले जाण्याची शक्यता आहे.



नागरिकांनी अशा भोंदूगिरीपासून सावध राहावे, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

आज अशोक खरातला न्यायलयात दाखल करण्यात आले होते, त्यावेळी खरातला न्यायलयाला कोठडी देण्यात आली आहे. उद्या पुन्हा एकदा खरातला कोर्टात हजर केलं जाणार आहे. अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे, उद्या २ एप्रिलला पुन्हा कोर्टात हजर करण्यात येणार आहे.

काल केलेल्या तपासात अशोक खरात चार वेगवेगळे मोबाईल क्रमांक वापरत असल्याचे समोर आले आहे. यापैकी एक क्रमांक हा केवळ व्हीआयपी व्यक्तींशी संपर्क साधण्यासाठी वापरला जात होता. दुसरा क्रमांक काही विशिष्ट भक्त आणि महिलांशी संवादासाठी वापरला जात असल्याची माहिती पुढे आली आहे. तिसरा मोबाईल क्रमांक हा आर्थिक व्यवहार आणि पैशांशी संबंधित कामांसाठी वापरला जात होता, तर चौथा क्रमांक हा सर्वसामान्य लोकांशी संपर्कासाठी असल्याचे समोर आले आहे.

## अशोक खरातचा मुलगा ताब्यात, पत्नीचा शोध सुरु

**नाशिक । प्रतिनिधी**

भोंदू अशोक खरातच्या पत्नीची चौकशी करायला गेलेल्या नाशिक पोलिसांनी अशोक खरातच्या मुलाला ताब्यात घेतलं आहे. या प्रकरणात पोलिसांनी जलदगतीने हालचाली करत ही कारवाई केली आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना खरातवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केल्यानंतर ती फरार झाल्याची माहिती समोर आली. आता पोलिसांनी अशोक खरातच्या मुलाला चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली.

अशोक खरातसोबत त्याची पत्नी कल्पना खरातवर शिर्डी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर नाशिक पोलीस कल्पना खरातची चौकशी करण्यासाठी खरातच्या निवासस्थानी गेले. मात्र,



कल्पना खरात आधीच फरार झाल्याची माहिती समोर आली. दरम्यान, यावेळी घरात असलेल्या अशोक खरातच्या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. तर कल्पना खरातच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथकं नाशिक आणि शिर्डीच्या दिशेने रवाना झाली आहेत. शिर्डीतील ४ एकर भूखंड खरेदीप्रकरणी अशोक खरातसह ५ जणांवर गुन्हा दाखल झालाय. मूळ जमीन मालक रावसाहेब गोंदकर यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, शिर्डीतला मध्यस्थ अरविंद बावके, किरण सोनावणे, अशोक तांबे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, शिर्डीमध्ये गुन्हा दाखल झाल्यावर खरातची पत्नी फरार झाल्याची माहिती आहे.

अरविंद बावके आणि किरण सोनावणे यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. फसवणूक आणि सावकारी अधिनियमांतर्गत शिर्डी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. कर्ज फेडण्यासाठी व्याजाने पैसे देत जमीन बळकावल्याचा आरोप आहे. शिर्डीत भोंदू खरातची कोट्यवधींची मालमत्ता आहे. या सर्व व्यवहारांची एसआयटी चौकशी करत आहे.

## हायवा ट्रकने कीर्तनकाराला चिरडले

**नांदेड । प्रतिनिधी**



कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या कीर्तनकारावर काळाने घाला घातला. वारकरी परिषदेची बैठक आटोपून दुचाकीने आपल्या गावी बारूळ येथे जातं असलेल्या ह.भ.प मधुकर महाराज बारूळकरयांना एका भरधाव हायवा ट्रकने चिरडलं. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी सायंकाळी नांदेड शहरातील सिडको परिसरात ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे.

ह.भ.प मधुकर महाराज बारूळकर हे कंधार तालुक्यातील बारूळ येथील रहिवासी आहेत. शिवाय मराठा सेवा संघाच्या संत नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष देखील होते. मागील अनेक वर्षापासून संघटनेत जोमाने काम करत होते. कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून अंधश्रद्धेपासून समाज दूर राहण्यासाठी नेहमी प्रयत्न करायचे. मंगळवारी सिडको परिसरात आयोजित वारकरी परिषदेच्या बैठकीत त्यांनी हजेरी लावली होती. बैठक संपन्न झाल्यानंतर ते दुचाकीने परत बारूळ गावी जातं होते सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास परिसरातील रुबी हॉटेल जवळ येताच पाठीमागून भरधाव वेगाने जातं असलेल्या हायवा ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली.


ट्रकखाली चिरडल्या गेल्याने ह.भ.प मधुकर महाराज यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी धाव घेतली. लग्न गर्दीचा फायदा घेत ट्रकचालक फरार झाला. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे. नांदेड शहरात जड वाहतुकीवर बंदी आहे. असे असताना शहरात जड वाहनाची ये-जा मोठ्या प्रमाणात सुरु आहे. सिडको हडको भागात रेती वाहतूक करणाऱ्या वाहनाची रेलचेल दिवसभर सुरूच असते. ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेती वाहतूक करणाऱ्या ट्रकने अनेकांना चिरडल्याच्या घटना घडल्या आहे. अशा वाहनावर कायमस्वरूपी बंधन आणावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होतं आहे.

## कीर्तनकारावर काळाचा घाला: मधुकर महाराजांचा ट्रकखाली मृत्यू

**नांदेड । प्रतिनिधी**

कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या कीर्तनकारावर काळाने घाला घातला. वारकरी परिषदेची बैठक आटोपून दुचाकीने आपल्या गावी बारूळ येथे जातं असलेल्या ह.भ.प मधुकर महाराज बारूळकरयांना एका भरधाव हायवा ट्रकने चिरडलं. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी सायंकाळी नांदेड शहरातील सिडको परिसरात ही दुर्दे वी घटना घडली. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे.

ह.भ.प मधुकर महाराज बारूळकर हे कंधार तालुक्यातील बारूळ येथील रहिवासी आहेत. शिवाय मराठा सेवा संघाच्या संत नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष देखील होते. मागील अनेक वर्षापासून संघटनेत जोमाने काम करत होते. कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून अंधश्रद्धेपासून समाज दूर राहण्यासाठी नेहमी प्रयत्न करायचे. मंगळवारी सिडको परिसरात आयोजित वारकरी परिषदेच्या बैठकीत त्यांनी हजेरी लावली होती. बैठक संपन्न झाल्यानंतर ते दुचाकीने परत बारूळ गावी जातं होते सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास परिसरातील रुबी हॉटेल जवळ येताच पाठीमागून भरधाव वेगाने जातं असलेल्या हायवा ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली.



ट्रकखाली चिरडल्या गेल्याने ह.भ.प मधुकर महाराज यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी धाव घेतली. लग्न गर्दीचा फायदा घेत ट्रकचालक फरार झाला. या घटनेने हळहळ व्यक्त होतं आहे. नांदेड शहरात जड वाहतुकीवर बंदी आहे. असे असताना शहरात जड वाहनाची ये-जा मोठ्या प्रमाणात सुरु आहे. सिडको हडको भागात रेती वाहतूक करणाऱ्या वाहनाची रेलचेल दिवसभर सुरूच असते. ग्रा मीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेती वाहतूक करणाऱ्या ट्रकने अनेकांना चिरडल्याच्या घटना घडल्या आहे. अशा वाहनावर कायमस्वरूपी बंधन आणावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होतं आहे.

## थोडक्यात...

### अजिंठा डोंगर रांगेत आढळ, अजिंठा चित्र शैलीत ही चित्रांकन

**सोयगाव । प्रतिनिधी**

पाच हजार वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्ण यांनी गितेत उपदेश दिला आहे की मला जर वृक्षा मध्ये शोधायचे असेल तर पिंपळा मध्ये शोधा.हाच पिंपळ वृक्ष जैन व बुद्ध धर्मातही पवित्र तथा बोधी वृक्ष मानला गेला. जैन धर्मात २४ तीर्थंकर असून भगवान महावीर हे २४ वे तीर्थंकर आहे. बौद्ध धर्मात २८ बुद्ध झाले व तथागत गौतम बुद्ध हे २८ वे बुद्ध असून कोनागामना हे पुढचे बुद्ध म्हणून अवतरण घेणार आहे.जैन व बुद्ध धर्मातील प्रत्येक तीर्थंकर व बुद्धांना वेगवेगळ्या वृक्षां खाली ज्ञान प्राप्त झाले आहे.त्यातील काही वृक्ष असे आहेत जे एका प्रजातीच्या वृक्षा खाली उपरोक्त अनेक महापुरुषांनी साधना केली आहे. असे हे एकूण ४८ वृक्ष आहे. जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा लेणी ज्या डोंगरात आहे त्यात या चैत्य व बोधी वृक्षां पैकी तब्बल २९ वृक्ष या डोंगर रांगेत जिल्ह्यातील पर्यावरण अभ्यासक सिल्लोड येथील डॉ. संतोष पाटील यांना वनाभ्यास करतांना आढळले आहे.

जागतिक वारसा असलेल्या अजिंठा -- वेरूळ येथील चित्र शैलीत चित्रन -अजिंठाच्या लेणी क्र १६ त छदम जातक कथा या चित्रात पलाश, नागकेशर, पिंपळ व बांबूचे वेणू बन ई वृक्ष चित्रित आहे. वेरूळ येथील जैन लेणीत अनेक चैत्य वृक्ष चित्रण आहे.

जैन धर्मातील चैत्य वृक्षांपैकी वड ( ऋषभनाथ ), सेमल- काटेसावर (अजितनाथ ), शिरीष ( सुपार्श्वनाथ ),बेहडा ( पुष्प दंत ) टेम्भूर्णी ( श्रेयांश नाथ ), पाटला ( वासुपूज्य ), जांभूळ ( विमलनाथ ), पिंपळ ( अनंतनाथ ), गोकर्ण ( धर्मनाथ ),टेम्भूर्णी ( कुंथू नाथ ), आंबा ( अर्हननाथ ), बकुळ ( नेमीनाथ ), धावडा ( पार्श्वनाथ ). ई.चा अधिवास या विस्तीर्ण डोंगर रांगेत आहे.

बुद्ध धर्मातील बोधी वृक्ष - पळस ( मेधनकारा ), पिंपळी ( दीपंकारा ), अर्जुन ( अनोमदस्सी), बांबू ( सुजाता ) सोनसावर (सिद्धत्थ), आसना ( तिस्सा ), आवळा ( फुस्सा ), पाटला ( विपस्सी), आंबा ( सीखी), शिरीष ( काकसंधा ), वड ( कुस्सप), पिंपळ (तथागत गौतम बुद्ध), उंबर ( कोना गामना).

चैत्य व बोधी वृक्ष असलेला नागकेशर, कदंब, हे वृक्ष या भागात वन्य नाही मात्र या डोंगरात असलेल्या मुर्डेश्वर मंदिर परिसरात देवस्थानानें रोपण केले आहे.

पाटला व वरून वृक्ष वैशिष्ट्यपूर्ण - पाटला हा बोधी वृक्ष गौताळामध्ये २ ठिकाणी आहे. पाटलीपुत्र ही सम्राट अशोकाची जन्मभूमी आहे. तिथे पाटला ची खुप झाडे होती म्हणून त्यास पाटलीपुत्र म्हणत. हा वृक्ष आय.यु. सी.एन च्या यादीत संकट ग्रस्त म्हणून नोंद आहे. वरून हा वृक्ष पाचवे बुद्ध रेवताचा पुत्र समजला जातो, तो वृक्ष ही अत्यंत दुर्मिळ असून केळगावच्या खाली उतरल्यावर डोंगराच्या मध्यात ही ८ ते १० झाडे असून यास स्थानिक भाषेत वायवर्ण म्हटले जाते.

## संपादकीय...

# तिऱ्हेची शोकांतिका

उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे गावात घडलेली घटना ही केवळ एक गुन्हेगारी किंवा वैयक्तिक शोकांतिका म्हणून पाहून चालणार नाही, तर ती आपल्या समाजातील खोलवर रुजलेल्या समस्यांचे भयावह प्रतिबिंब आहे. एका वडिलांनी आपल्या तीन निष्पाप मुलांना विष पाजून स्वतःही जीवन संपवण्याचा प्रयत्न केला, ही बाब केवळ धक्कादायक नाही तर अंतर्मुख होण्यास भाग पाडणारी आहे. कौटुंबिक वाद ही नवीन बाब नाही. प्रत्येक घरात मतभेद होतात, तणाव निर्माण होतो. मात्र, त्या तणावाचा शेवट इतक्या टोकाच्या आणि अमानवी निर्णयात होणे ही गंभीर चिंतेची बाब आहे. भीमा वाघमारे यांच्या प्रकरणातही हेच दिसून येते. पत्नी माहेरी गेल्यानंतर निर्माण झालेली एकाकीपणाची भावना, मानसिक तणाव आणि कदाचित आर्थिक दडपण यांनी मिळून त्यांना असा निर्णय घ्यायला प्रवृत्त केले असावे. ही घटना आपल्याला सांगते की, केवळ बाह्य परिस्थिती नव्हे तर अंतर्गत भावनिक अस्थिरताही किती घातक ठरू शकते. या घटनेत सर्वात वेदनादायक बाब म्हणजे तीन निष्पाप मुलांचे आयुष्य धोक्यात आले. मुलांना या वादाचा काहीही संबंध नसताना त्यांना शिक्षा मिळाल्यासारखे झाले. पालक हे मुलांचे संरक्षक असतात, त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर असते. पण जेव्हा संरक्षकच संकट बनतात, तेव्हा समाजाने स्वतःला प्रश्न विचारण्याची वेळ येते. आपण मुलांच्या हक्कांबद्दल बोलतो, पण त्यांच्या सुरक्षिततेची हमी देण्यात आपण कितपत यशस्वी आहोत? मानसिक आरोग्य हा आपल्या समाजात अजूनही दुय्यम विषय मानला जातो. नैराश्य, तणाव, अपयशाची भीती, एकाकीपणा-हे सर्व आजच्या जीवनाचा भाग झाले आहेत, पण त्यावर मोकळेपणाने चर्चा करण्याची सवय अजूनही तयार झालेली नाही. अनेकदा पुरुषांवर भावना व्यक्त करू नयेत असा सामाजिक दबाव असतो. त्यातून निर्माण होणारी घुसमट अनेकदा अशा टोकाच्या निर्णयांतून बाहेर पडते. भीमा वाघमारे यांच्या कृतीचे समर्थन करता येणार नाही, पण त्यामागील मानसिक स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात ही समस्या अधिक तीव्र आहे. शहरांमध्ये काही प्रमाणात समुपदेशन, हेल्पलाईन्स, मानसोपचार तज्ञ उपलब्ध असतात, पण गावपातळीवर अशा सुविधा अत्यल्प आहेत. एखाद्या व्यक्तीला मानसिक आधाराची गरज असताना तो कुठे जावा, कोणाशी बोलावे, हेच त्याला समजत नाही. त्यामुळे समस्या मनात साचत जाते आणि एके दिवशी ती स्फोटक रूप धारण करते. कुटुंब आणि नातेवाईक यांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. वाद मिटवण्याचे प्रयत्न झाले, पण ते अपुरे ठरले. अशा परिस्थितीत केवळ समजावणी पुरेशी नसते. कधी कधी तटस्थ तिसऱ्या व्यक्तीचे मार्गदर्शन, समुपदेशन किंवा सामाजिक हस्तक्षेप आवश्यक असतो. गावपातळीवर 'कुटुंब सल्ला केंद्रे' आणि 'समुपदेशन शिबिरे' नियमितपणे आयोजित करण्याची गरज आहे. प्रशासनासाठीही ही घटना धोक्याची घंटा आहे.

# एप्रिल २०२६ मध्ये 'विशेष डिजिटल शेती शाळा'; राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार 'विशेष डिजिटल शेती शाळा' आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचा यामध्ये सहभाग असून १ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान विशेष डिजिटल शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले आहे या शेतीशाळांचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

विशेष डिजिटल शेतीशाळांचे वेळापत्रक व विषय :- शेतीशाळा- १ (१ एप्रिल २०२६) : पेरणीपूर्व तंत्रज्ञान - बेड तयार करणे व बेडवर टोकण करणे, शून्य/कमीत कमी मशागत करणे, आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीजप्रक्रिया, शेतीशाळा- २ (८ एप्रिल २०२६): जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे, शेतीशाळा- ३ (१५ एप्रिल २०२६): एकात्मिक कीड व्यवस्थापन- सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र किटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर, शेतीशाळा- ४ (२२ एप्रिल २०२६) : भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र- भाताची थेट पेरणी (डीएसआर), श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत. सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना सायंकाळी ७.३० वाजता सुरु होणार असून या शेती शाळांचे लाइव्ह प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पाणी फाउंडेशन आणि उमेदच्या यू-ट्यूब चॅनेलवर केले जाणार आहे.

हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपरिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान सुरू करण्यात आले. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे.




हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन आहे. राज्यातील सर्व प्रकारच्या पीक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचेमार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टेधारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे.

# मुरुडमध्ये लाचखोर अभियंत्याचा खरा चेहरा उघड!

## २.५ लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले; ACB च्या जाळ्यात सापडली श्रद्धा बो-हाडे

**रेवदंडा । प्रतिनिधी**

मुरूड येथे सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांचा लाचखोर चेहरा आता उघड झाला आहे. ठेकेदाराकडून ३ लाखांची लाच मागितल्यानंतर तडजोडीने २.५ लाखांवर समाधान मानून ती रंगेहाथ पकडली गेली. अँटी-करप्शन ब्युरो रायगड-अलिबागने केलेल्या सापळ्यात ही भ्रष्ट अधिकारी ताब्यात घेतली असून, तिच्या कारकिर्दीला मोठा धक्का बसला आहे.

सन २०२४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागकडून मुरूड-एकदरा-राजापुरी-खोकरी रोडवरील किमी ५/२७० च्या बाजूचे स्लॅब ड्रेन कामाचा टेंडर मिळवलेल्या ठेकेदाराने काम पूर्ण केले. पण फायनल बिल इस्टीमेट तयार करण्यासाठी सा.बां. उपविभाग मुरूडच्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांनी तब्बल ३ लाखांची लाच मागितली. नाकारल्यावर तिने तडजोडीने २.५ लाखांवर शिक्कामोर्तब केले. याबाबत दि. २८ मार्च रोजी ठेकेदाराने ACB रायगड-अलिबागकडे तक्रार दाखल केली.-उइ ने तक्रारीची पडताळणी केली असता बो-हाडे यांनी लाचेची मागणी आणि स्वीकृती मान्य केली. दि. ३० मार्च रोजी मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात सापळा रचला असता, बो-हाडे यांनी ठेकेदाराकडून पंचांसमोर २,५०,००० रुपये रोख स्वीकारताना रंगेहाथ पकडल्या गेल्या.




ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील (ACB ठाणे), अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे व सुहास शिंदे (ACB ठाणे), पोलीस उपाधीक्षक सरिता भोसले (जेसीबी रायगड) यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय निशांत धनवडे, पीआय नारायण सरोदे, विनोद जाधव, अरूण करकरे, महेश पाटील, सुमित पाटील, सचिन आटपाडकर, नवदीत नांदगांवकर, मोनिका मोरे (ACB रायगड-अलिबाग) यांनी यशस्वी केली.भ्रष्टाचाराचे जाळे: राजकीय पुढारी, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांचा खेळ!लाच देणारा आणि घेणारा दोघेही गुन्हेगार! काम अडेल या भीतीने पैसे देणे म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे. अनेक ठेकेदार दुप्पट-तिप्पट बिल बनवून श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहतात, मंजुरीसाठी अधिकाऱ्यांना लाच देतात. यात राजकीय पुढारींची टक्केवारीची गुतागुती असते - माझे कमिशन मला मिळायला हवे असा दबाव! अशा साखळीत कोणीतरी अडकतोच.

मुरूड प्रकरणाने हे जाळे उघड झाले आहे. लाच देणे-घेणे हा गुन्हाच आहे; यात सर्वजण समान दोषी!या प्रकरणाने सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराची कळ येईल अशी शक्यता आहे. ACB कडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, लाच मागणाऱ्या लोकसेवकांबाबत माहिती असल्यास तात्काळ संपर्क साधावा. भ्रष्टाचाराच्या विरोधात ACB कठोर कारवाई करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# शेतकरी केवळ 'उत्पादक' नव्हे तर यशस्वी 'उद्योजक' व्हावा - पणन मंत्री जयकुमार रावल

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. यासाठी पणन विभागाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना पणन मंत्री रावल म्हणाले, राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार व्यवस्थेपेक्षा अधिक आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याची गरज आहे.

यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वाढवण पोर्ट परिसरात सुमारे १२०० एकरवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, ज्यामुळे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतीमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयास येईल.




राज्यात शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) आणि शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) या केवळ योजना नसून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची मोठी चळवळ असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी नमूद केले. लहान व सीमांत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. एफपीओच्या माध्यमातून उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण मूल्य साखळी उभारता येते. यामध्ये लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि मार्केटिंग या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देता येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.


# माओवादाविरुद्ध लढा दिलेल्या सी-६० जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-६० पदक' देण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळविले आहे. आता माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी-६० मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-६० पदक' देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद झाली. या परिषदेस गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच भारतीय पोलिस प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात २४४ पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर ६०९ नागरिकांनी प्राण गमावले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस यंत्रणेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, गुन्हे अन्वेषण आणि न्यायप्रक्रियेत 'एंड टू एंड' डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे सांगितले. विविध अन्वेषण आणि क्राईम मॉडेल्सचा समन्वय साधून संपूर्ण क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. डिटेक्शनपासून एव्हिडन्स संकलन, चार्जशीट दाखल करणे यांसह सर्व प्रक्रिया शंभर टक्के डिजिटल झाल्यास पुराव्यांची अचूकता आणि साखळी अधिक मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नवी मुंबईत राबविण्यात आलेल्या ब्लॉकचेन-आधारित एव्हिडन्स मॅनेजमेंट सिस्टीमप्रमाणे प्रणाली राज्यभर लागू केल्यास पुराव्यातील छेडछाड रोखता येईल, असे सांगून पुढील सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्व्हिक्शन रेट) वाढवण्यास अपयशी ठरलेल्या प्रकरणांचे विश्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सीआयडी'ला दिले. राज्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषारोप दर वाढवण्यासाठी ठोस कार्यपद्धती (एसओपी) आणि स्पष्ट रोडमॅप तयार करावा असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचबरोबर पोलीस आणि सरकारी वकिलांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन करणारा डॅशबोर्ड विकसित करण्यावर त्यांनी भर दिला.



रस्ते अपघातांबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले नागपूर आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रयोगांमुळे अपघातात घट झाली आहे. त्यामुळे योग्य तंत्रज्ञान आणि रणनीती वापरून मृत्यूदर कमी करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सायबर सुरक्षेबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मशी अधिक प्रभावी समन्वयाची गरज व्यक्त केली. आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यासाठी विलंब टाळण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. सायबर स्पेसमध्ये वाढणाऱ्या रॅडिकलायझेशनकडे लक्ष वेधत, यावर प्रोक्टिव्ह उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी पोलीस यंत्रणांना केले. पोलीस दलातील अंतर्गत संवादावर भर देताना, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कनिष्ठांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. नेतृत्व म्हणजे लोकांना प्रेरणा देणे असे नमूद करत, अधिकाऱ्यांनी स्वतःच्या वर्तनातून आदर्श निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर, प्रत्येक अधिकाऱ्यांने जनतेशी संवाद साधण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी गुन्हेगारीविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण कठोरपणे राबवण्याचे निर्देश पोलीस अधिकाऱ्यांना दिले. ड्रग्ससंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही समस्या पुढील पिढीला पंगू करणारी आहे, अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करून पूर्णतः आळा घालण्याचे आदेश त्यांनी दिले. बेकायदेशीर कृत्यांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. मागील काळात फॉरेन्सिक कामांच्या प्रलंबित प्रकरणात पोलीस प्रशासनाने ठोस उपाययोजना राबवत ही पेंडन्सी लक्षणीयरित्या कमी करण्यात यश मिळवले आहे. पूर्वी २ ते ३ लाखांपर्यंत प्रकरणे प्रलंबित राहत होती, ती आता मोठ्या प्रमाणात घटली असून ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. पुढील काळात सर्व प्रलंबित प्रकरणे पूर्णपणे निकाली काढून फॉरेन्सिक कामकाज रिअल-टाइम पद्धतीने करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## महात्मा जोतिराव फुले जयंती निमित्त विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करावेत - फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**



क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालावधी द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य, विचार पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे नेण्याची संधी असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यावर आधारित विविध कार्यक्रमांची वार्षिक दिनदर्शिका बनवून वर्षभर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याचे निर्देश दिले.

मंत्रालयात आयोजित क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गठीत समितीमध्ये संलग्नित विभागाने किमान दोन ते तीन कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा प्रेरक कार्यक्रमांचे नियोजन १५ एप्रिल पर्यंत देण्यात यावे. महात्मा जोतिराव फुले यांचे मूळ गाव खानवडी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील त्यांच्या स्मृती जपणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात ११ एप्रिल रोजी सीबीएससी शिक्षण, आधुनिक सुविधांनी युक्त खानवडी जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाने करावी.

## संक्षिप्त

### मुरुडमध्ये लाचखोर अभियंत्याचा खरा चेहरा उघड

**रायगड । प्रतिनिधी**

मुरूड येथे सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांचा लाचखोर चेहरा आता उघड झाला आहे. ठेकेदाराकडून ३ लाखांची लाच मागितल्यानंतर तडजोडीने २.५ लाखांवर समाधान मानून ती रंगेहाथ पकडली गेली. अँटी-करप्शन ब्युरो रायगड-अलिबागने केलेल्या सापळ्यात ही भ्रष्ट अधिकारी ताब्यात घेतली असून, तिच्या कारकिर्दीला मोठा धक्का बसला आहे.सन २०२४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागकडून मुरूड-एकदरा-राजापुरी-खोकरी रोडवरील किमी ५/२७० च्या बाजूचे स्लॅब ड्रेन कामाचा टेंडर मिळवलेल्या ठेकेदाराने काम पूर्ण केले. पण फायनल बिल इस्टीमेट तयार करण्यासाठी सा.बां. उपविभाग मुरूडच्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांनी तब्बल ३ लाखांची लाच मागितली. नाकारल्यावर तिने तडजोडीने २.५ लाखांवर शिक्कामोर्तब केले. याबाबत दि. २८ मार्च रोजी ठेकेदाराने -उइ रायगड-अलिबागकडे तक्रार दाखल केली.-उइ ने तक्रारीची पडताळणी केली असता बो-हाडे यांनी लाचेची मागणी आणि स्वीकृती मान्य केली. दि. ३० मार्च रोजी मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात सापळा रचला असता, बो-हाडे यांनी ठेकेदाराकडून पंचांसमोर २,५०,००० रुपये रोख स्वीकारताना रंगेहाथ पकडल्या गेल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील , अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे व सुहास शिंदे , पोलीस उपाधीक्षक सरिता भोसले (जेसीबी रायगड) यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय निशांत धनवडे, पीआय नारायण सरोदे, विनोद जाधव, अरूण करकरे, महेश पाटील, सुमित पाटील, सचिन आटपाडकर, नवदीत नांदगांवकर, मोनिका मोरे (-उइ रायगड-अलिबाग) यांनी यशस्वी केली. भ्रष्टाचाराचे जाळे: राजकीय पुढारी, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांचा खेळ!लाच देणारा आणि घेणारा दोघेही गुन्हेगार! काम अडेल या भीतीने पैसे देणे म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे. अनेक ठेकेदार दुप्पट-तिप्पट बिल बनवून श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहतात, मंजुरीसाठी अधिकाऱ्यांना लाच देतात. यात राजकीय पुढारींची टक्केवारीची गुतागुती असते - माझे कमिशन मला मिळायला हवे असा दबाव! अशा साखळीत कोणीतरी अडकतोच. मुरूड प्रकरणाने हे जाळे उघड झाले आहे. लाच देणे-घेणे हा गुन्हाच आहे; यात सर्वजण समान दोषी!या प्रकरणाने सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराची कळ येईल अशी शक्यता आहे. -उइ कडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, लाच मागणाऱ्या लोकसेवकांबाबत माहिती असल्यास तात्काळ संपर्क साधावा. भ्रष्टाचाराच्या विरोधात -उइ कठोर कारवाई करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. एकीकडे झोपडपट्टी पुनर्विकासाला गती देत दुसरीकडे 'नेत्रम' तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या झोपड्या उभारल्या जाऊ नये याची पण काळजी घेतली जाणार आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हे महत्वाचे अभियान राबवून एकप्रकारे बाळासाहेबांना ही आदरांजलीच वाहिली आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रक्रियेला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील झोपडपट्टीमुक्त मुंबई साकार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

या अभियानात किमान ५० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आणि ५१ टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्टी क्षेत्र असलेल्या समूहांचा समावेश करण्यात येणार आहे.

# अपघात प्रकरणात कुटुंबीयांना २७ लाखांची भरपाई

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

न्याय मिळण्यास उशीर होईल, पण तो मिळतोच या वाक्याची सार्थता छत्रपती संभाजीनगरमध्ये एका दुर्दैवी प्रकरणात दिसून आली आहे. टाउन हॉल उड्डाणपुलावर झालेल्या भीषण अपघातात अल्पवयीन विद्यार्थिनी आकेफा मेहरीनचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात तिच्या कुटुंबीयांना तब्बल सात वर्षांनंतर न्याय मिळाला आहे.

मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने या प्रकरणात २७ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. ही रक्कम विमा कंपनी, वाहन मालक आणि चालक यांनी संयुक्तपणे अदा करावी, असे स्पष्ट निर्देश न्यायाधिकरणाने दिले आहेत. या अपघातात मृत्यू झालेली आकेफा मेहरीन ही २२ एप्रिल २०१९ रोजी दुपारी दुचाकीवरून आरेफ कॉलनीहून भडकल गेटकडे जात होती. त्याच वेळी जामा मशिदीकडून वेगात येणाऱ्या एका कारने टाउन हॉल उड्डाणपुलावर तिच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. ही कार सिटी चौक पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक संतोष पाटे चालवत होते. अपघातात आकेफाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. उपचार सुरू असतानाच दोन दिवसांनंतर, २४ एप्रिल २०१९ रोजी तिचा मृत्यू



झाला. या घटनेनंतर आकेफाच्या आई-वडिलांनी ॲड. फय्याज पटेल आणि ॲड. सईद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार अपघात न्यायाधिकरणात नुकसानभरपाईचा दावा दाखल केला होता. सुनावणीदरम्यान विमा कंपनीने मृत मुलगी अल्पवयीन होती आणि तिच्याकडे दुचाकी चालवण्याचा परवाना नव्हता असा युक्तिवाद केला. मात्र न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेत स्पष्ट केले की, केवळ पीडितेकडे परवाना नसल्यामुळे अपघाताची संपूर्ण जबाबदारी तिच्यावर टाकता येत नाही. अपघात हा कार चालकाच्या निष्काळजीपणामुळे आणि वेगामुळे घडल्याचे सांगितले.

## परतुर रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने पाणपोई सेवा सुरू



**परतूर । प्रतिनिधी**

परतुर रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने प्रवाशांच्या सोयीसाठी बस स्थानक परिसरात पाणपोई सेवेचा शुभारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी राबविण्यात येत असून, यावर्षीही समरसतेचा संदेश देत ही सेवा सुरू करण्यात आली.

या पाणपोई सेवेचा शुभारंभ एस. पी. पाटोदकर व गोविंद तापडिया यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास आगार व्यवस्थापक सौ. माधुरी देशमुख, परतुर रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. स्वप्नील बी. मंत्री, उपाध्यक्ष सखाराम कुलकर्णी, वाहतूक निरीक्षक सुरेखा साळवे, वाहतूक नियंत्रक बरसाले, कासम शेख तसेच इतर कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी समितीचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असून, प्रवाशांनी या सेवेचे स्वागत करत समितीचे आभार मानले

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या लीज व्यवहारातील संभाव्य अनियमिततेबाबत स्वतंत्र चौकशीची मागणी - खासदार डॉ. कल्याण काळे यांचे अर्थमंत्र्यांना पत्र

**जालना । प्रतिनिधी**

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना पत्र पाठवून इरपज्ञ`ष चरहरीरीहींर संदर्भातील पुणे येथील लीज व्यवहारात संभाव्य अनियमितता झाल्याची शक्यता व्यक्त करत स्वतंत्र व वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी हा विषय सार्वजनिक निधीची सुरक्षितता, पारदर्शकता व उत्तरदायित्वाशी संबंधित अत्यंत गंभीर विषय असल्याचे नमूद केले आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले आहे की बँकेने स्वतःच्या मालकीच्या जागेवरील मुख्य कार्यालय हलवून बाणेर-पाषाण लिंक रोड, पुणे येथील भाडेतत्त्वावरील जागेत स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. उपलब्ध माहितीनुसार सुमारे १.२५ लाख चौरस फूट कार्यालयीन जागेसाठी १५ वर्षांची लीज व्यवस्था करण्यात आली असून यासाठी सुमारे १११६ कोटी (व्याज परिणामासह) इतका खर्च अपेक्षित आहे.

खासदार डॉ. काळे यांनी स्पष्ट केले की पुण्यात बँकेकडे स्वतःची जागा उपलब्ध असताना असा निर्णय वित्तीय शहाणपणाच्या दृष्टीने संशयास्पद ठरतो. त्यांनी सांगितले की स्वतःच्या जागेवर सुमारे ६० कोटी खर्च करून नवीन इमारत उभारणे शक्य होते, ज्यामुळे बँकेला कायमस्वरूपी मालमत्ता मिळाली असती आणि दीर्घकालीन खर्चात बचत झाली असती. निविदा प्रक्रियेत नमूद अटींचे पालन झाले आहे का, याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यामध्ये पार्किंगची पुरेशी व्यवस्था, रेरा नियमांचे पालन, सलग मजले उपलब्धता, कार्पेट क्षेत्राचे अचूक मापन तसेच फर्निचर व फिट-आउट खर्चाचे औचित्य यांचा समावेश आहे.

तसेच कार्पेट क्षेत्र, पार्किंग व फिट-आउट संदर्भातील खर्चाची स्वतंत्र तपासणी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात अंतर्गत सतर्कता यंत्रणेची कार्यक्षमता तसेच मुख्य सतर्कता अधिकाऱ्यांची भूमिका यांचीही चौकशी व्हावी, तसेच लीज अंतिम करण्यापूर्वी आवश्यक ती दक्षता घेतली गेली होती का, याचा तपास करावा, असे त्यांनी नमूद केले।

तसेच परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या गुंतवणूकदारांनी केलेल्या तक्रारींवर अपेक्षित कारवाई न झाल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय बँकिंग व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम होऊ शकतो, अशी त्यांनी चिंता व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. काळे यांनी वित्त मंत्रालयाला विनंती केली आहे की या संपूर्ण प्रकरणाची योग्य केंद्रीय यंत्रणेमार्फत स्वतंत्र व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी, वित्तीय शिस्त व Central Vigilance Commission यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले आहे का याची पडताळणी करण्यात यावी तसेच अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

व्हिसलब्लोअर्सचे संरक्षण सुनिश्चित करून चौकशी अहवाल पारदर्शकपणे जाहीर करण्यात यावा, जेणेकरून जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी मागणी त्यांनी केली. हा विषय सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या विश्वासार्हतेशी व जनतेच्या पैशांच्या सुरक्षिततेशी निगडित असल्याने

यावर तातडीने व निष्पक्षपणे निर्णय घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भारतीय जैन संघटनेचा सेवायज्ञ; २८८ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

अहिंसा परमो धर्म' आणि 'सेवा' हाच खरा धर्म असल्याचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटनेच्या जालना शाखेच्यावतीने आयोजित आरोग्य शिबिरास जालनेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मंगळवारी (३१ मार्च) गुरु गणेश तपोधाम परिसरात पार पडलेल्या या शिबिरात एकूण २८८ नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन महावीर स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा, जैन मूर्तीपूजक श्रीसंघाचे अशोक बिनायकिया, उत्तमचंद बनवट, तेरापंथ समाजाचे ड. अनिल संचेती, दिगंबर जैन समाजाचे संजय लव्हाडे आणि भारतीय महिला जैन संघटनेच्या अध्यक्षा सरिता कुचेरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जालना महापालिकेचे उपमहापौर राजेश राऊत आणि



नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी शिबिरास भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी संयोजक राजेश लुनिया, विजय जैन, डॉ. गिरीश पाकणीकर, अरुण मित्तल, संजय मुथा, डॉ. धरमचंद गादिया, विजय सुराणा, अतुल लड्डा, महावीर गिल्डा, अशोक जोगड, नरेंद्र जोगड, भरत गादिया, दर्पण सकलेचा, महावीर रुणवाल, सीए गोपाल अग्रवाल, हेमंत ठक्कर, अनिल सोनी, वीरेंद्र रुणवाल, गौतम श्रीश्रीमाल, रोहित भुरेवाल, विनोद बंब, विजय मुथा, जालना ब्लड बँकेचे गणेश चौधरी, मुन्ना गादिया, कांतीलाल सेठीया, स्मिता आबड, सपना लुनिया, सरोज समदरीया आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना संयोजक राजेश लुणिया म्हणाले की, भगवान महावीरांच्या जयंतीनिमित्त समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जालनेकरांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आम्ही ऋणी आहोत.

या शिबिरातआधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विरा मेडीसिटी कार्किनोस कॅन्सर सेंटरच्यावतीने व्हिएल स्कोपद्वारे मुख कर्करोग, ब्रेस्ट स्कॅनद्वारे स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग अशा एकूण ८२ जणांची मोफत तपासणी करण्यात आली. लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे १५५ रुग्णांची नेत्र तपासणी झाली.

यापैकी मोतीबिंदूचे निदान झालेल्या १२ रुग्णांवर जालना येथील लायन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. जालना ब्लड बँकेच्या सहकार्याने पार पडलेल्या या उपक्रमात ५१ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले.शिबीर यशस्वी करण्यासाठी संघटनेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि डॉक्टरांच्या पथकाने परिश्रम घेतले

## अजिंक्यपद ट्रॉफीचे मान्यवरांच्या हस्ते वितरण

**जालना । प्रतिनिधी**



गोरी फेडरेशन ऑफ इंडिया च्या अंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र लगोरी असोसिएशन आणि जालना जिल्हा लगोरी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ८ व्या सब-ज्युनियर राज्यस्तरीय अजिंक्यपद लगोरी स्पर्धेचा बदनापूर येथे अत्यंत उत्साहात समारोप झाला.

या स्पर्धेत पालघर जिल्ह्याने आपले निर्विवाद वर्चस्व गाजवत मुलांच्या आणि मुलींच्या अशा दोन्ही गटांत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले तर पुणे ग्रामीण उपविजेता ठरला. या स्पर्धे साठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील संघ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, बीड, जालना, परभणी या मराठवाड्यातील जिल्ह्यांसह पुणे, पुणे ग्रामीण, रायगड, ठाणे, मुंबई, मुंबई सब अब, नाशिक, धुळे आदी जिल्ह्यांचे संघ सहभागी झाले होते.

**स्पर्धेचा निकाल:**

मुले: या गटात पालघर संघाने सुवर्णपदक पटकावून प्रथम क्रमांक मिळवला. पुणे ग्रामीण संघाने रौप्य, तर पुणे शहर संघाने कांस्यपदक मिळवले.

मुली: मुलींच्या गटातही पालघर ग्रामीण संघाने बाजी मारत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. पुणे संघाने रौप्य, तर बुलढाणा जिल्ह्याने कांस्यपदक पटकावले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जालना जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष अक्षय विष्णूनाना पवार, महाराष्ट्र लगोरी असोसिएशनचे सदस्य राजेंद्र पाटील, तुषार जाधव आणि प्रवीण जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच छत्रपती संभाजीनगरचे सचिव गोकुळ तांदळे, जालना जिल्ह्याचे क्रीडा संघटक उमेश खंदारकर, जिल्हा सचिव संतोष वाघ, देवरे, जारवाल, निलेवार, जिजाडे, डॉ.आडे सर, घुगे सर, ढाकणे सर, भागवत पवार, बळीराम शिंदे, शेख अहमद, बॉक्सर पाटील, शेळके आणि डोईफोडे या क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# महावीर जन्मकल्याणकनिमित्त शोभायात्रेत उसळला जनसागर

## शोभायात्रेत प्रेम, शांतता आणि एकतेचं दर्शन; ठिकठिकाणी पुष्पवृष्टीने स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

श्री भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त सकल जैन समाजाच्यावतीने मंगळवार दि. ३१ मार्च रोजी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेतील अहिंसा परमो धर्म, जिओ और जिने दो जयघोषाने जालना शहर दुमदूमून गेले. पांढ्याशुभ्र वस्त्रांमधील हजारो बांधव, भगिनी आणि चिमुकल्यांच्या उत्साहाने अवघी नगरी चैतन्याने न्हाऊन निघाली होती. ८ हजारावर समाजबांधवांच्या शिस्तबद्ध सहभागाने आणि जागोजागी होणाऱ्या पुष्पवृष्टीने या शोभायात्रेला एका भव्य सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले; ज्याने संपूर्ण जालन्याचे लक्ष वेधून घेतले. उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनीही जन्मकल्याणक सोहळ्याला भेट देऊन समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

सकल जैन समाजाच्यावतीने प. पू. उपाध्याय विभजनसागरजी महाराज, पैसठिया छंद आराधिका करुणामूर्ती प. पू. किरणसुधाजी म. सा. जैन सिद्धांतचार्या प. पू. प्रशांतकवरजी म. सा. आणि प. पू. विभाश्रीजी म. सा. यांच्या मंगलमय सानिध्यात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ८.३० वाजता भगवान महावीर चौक येथे संत-साध्वीच्या मांगलिकनंतर ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर शोभायात्रेला प्रारंभ झाला. वाजत-गाजत, भजन, टाळ मृदंगाच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीच्या अग्रभागी भगवान महावीर यांची पालखी, रथ, इंद्रध्वज होता. मॅजेस्टिक टॉकीज रोड, पाणी वेस, काद्राबाद, फुल बाजार, अहिंसा मार्ग, शोला चौक, जवाहर बाग, बडी सडक, श्रीराम मंदिर मार्गे येऊन या शोभायात्रेचा समारोप गुरु गणेशनगर येथे झाला. या मिरवणुकीमध्ये सहभागी पुरुषांनी श्वेत वस्त्र आणि महिलांनी लाल चुंदडी परिधान केली होती. अन्य समाजाच्यावतीनेसुद्धा मिरवणुकीचे ठिक-ठिकाणी स्वागत करण्यात आले. ठिक-ठिकाणी पाणी, शरबत, ताकाची व्यवस्था करण्यात आली होती.

या शोभायात्रेत सकल जैन समाजाचे अध्यक्ष महावीर रुणवाल, कार्याध्यक्ष संजय लव्हाडे, उपाध्यक्ष मनोज मोदी आणि ड. अनिल संचेती, महासचिव विजय जैन, सहसचिव चैतन्य वायकोस, मनोज मोदी,



प्रमोद देसरडा, शिखरचंद लोहाडे, प्रवीण पहाडे, परेश धोका, ड. रोशन गोलेच्छा, लोहाडे, संतोष बडजाते, सुदेश सकलेचा, डॉ. धरमचंद गादिया, त्रिभुवन सिंघवी, विनोद धोका, अजीत छाबड़ा, राजेश पाटनी, जीनदास वायकोस, सुभाष वायकोस, विजय सावजी,कांतीलाल सेठिया, राजेश लुनिया, नरेंद्र पहाडे, संजय मुथा, प्रकाश नेवे, सिद्धार्थ रुणवाल, रवींद्र संचेती, राजू पोरवाल, वीरेंद्र रुणवाल, दीपक मोदी, अशोक बिनायके, पंकज पाटणी, कचरूलाल कुंकूलोळ, गणेश काले, नरेंद्र जोगड, श्रीपाल मरलेचा, चेतन बोथरा, पंकज खिवंसरा, महेंद्र गादिया, आकाश बोथरा, अजय बोरा, गौतम संचेती, मनोज गंगवाल, महेंद्र पाटणी, विलास जैन, दर्पण सकलेचा, कन्हैयालाल पाटणी, पंकज कासलीवाल, शैलेश बडजाते यांच्यासह आठ हजारावर समाज बांधव सहभागी झाले होते. शोभायात्रेच्या समारोपानंतर संत आणि साध्वींचे मंगलमय प्रवचन आणि त्यानंतर महाप्रसादी झाली. भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी सकल जैन समाजाला आणि जिल्हावासीयांना शुभेच्छा दिल्या. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि समतेचा विचार आजही तितकाच प्रासंगिक आहे. जालन्यातील या भव्य शोभायात्रेतून दिसलेली शिस्त आणि एकता कौतुकास्पद असून, महावीरांच्या तत्त्वांचे पालन करून समाजात शांतता व सलोखा टिकवून ठेवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**